# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

**प्रस्तावाना:-**

**विषय :- आजादीका अमृत महोत्सव घर झेंडा राष्ट्रीय सण साजरा करणे याकामी अंदाजपत्रकीय निधी तरतुदीचे पुनर्वियोजन करणेस आणि हर घर झेंडा व मेटल ध्वज खरेदी करणेकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव.**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव ("आजादी का अमृत महोत्सव") अंतर्गत हर घर झेंडा उपक्रम अंतर्गत राष्ट्रीय महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. याबाबत पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण८२२२/प्र.क्र.१६१/सां.का.४ दि.३०/०६/२०२२ व श्रीमती प्रियांका कुलकर्णी-छापवाले, उप सचिव नगरविकास विभाग, यांचेकडील जा.क्र.संकिर्ण-२०२२/प्र.क्र.२११/नवि-२० दि.०७/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये हर घर झेंडा उपक्रमात घरोघरी झेंडा लावणे, स्वराज्य महोत्सव अंतर्गत सर्व शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, सर्व शालेय विद्यार्थी यांना मेटल राष्ट्रध्वज उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने राष्ट्रीय ध्वज खरेदी करणेकामाचा रक्कम रू. ४०,००,०००/- खर्च प्रस्तावित केला आहे. तसेच मेटल ध्वज खरेदी रक्कम अंदाजे रू. ५,००,०००/- खर्च अपेक्षीत आहे. यानुसार या उपक्रमावर अंदाजे रू.४५,००,०००/- खर्च अपेक्षीत आहे. मुळ लेखा शिर्ष "सण व उत्सवावर खर्च करणे " रू. १०,००,०००/- (अक्षरी- रु. दहा लक्ष ) करण्यात आली होती, याकामी रक्कम रू. ७,९६,९६०/- प्रत्यक्ष खर्च झाला आहे. या मध्ये रक्कम रू. २,०३,०४०/- इतकी शिल्लक तरतुद आहे. हर घर झेंडा उपक्रम राबविणेकामी सन २०२२-२३ च्या "सण व उत्सव साजरे करणे या लेखाशिर्षखाली पूरेशी आर्थिक तरतूद नसल्याने पुनर्वियोजन करणे आवश्यक आहे.

सध्या जनसंपर्क विभागाकडे **" निविदा व जाहीरात प्रसिध्दी इतर खर्च "** या लेखा शिर्ष अंतर्गत सन मुळ तरतुद १,५०,००,००० आहे. यामध्ये प्रत्यक्ष झालेले खर्च रु. ५६,०१,६८८/- इतका झालेला आहे व रक्कम रू ९३,९८,३१२/- शिल्लक आहे. या शिल्लक रक्कमेतून रक्कम रू.४५,००,०००/- पंचेचाळीस लक्ष रूपये सण व उत्सव लेखाशिर्षात वर्ग करणे आवश्यक आहे. यासोबत लेखा पुनर्विनायोजन नमुना नं. १० (नियम ३० (३) नुसार पुर्नवनियोजन प्रस्ताव सादर केला आहे. तरी निविदा व जाहीरात प्रसिध्दी या लेखा शिर्षातून रक्कम रू.४५,००,०००/- पंचेचाळीस लक्ष रूपये **"सण व उत्सव समारंभ साजरे करणे"** या लेखाशिर्षात वर्ग करणे याकामी पुर्नविनियोजन प्रस्ताव सादर केला आहे. त्यास मान्यता मिळणे.

तसेच हर घर झेंडा या उपक्रम अंतर्गत झेंडे खरेदी करणेकामी रू. ४०,००,०००/- तसेच मेटल ध्वज खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु. ५,००,००० /- (पाच लक्ष ) असे एकूण रक्कम रु. ४५,००,०००/- खर्चाचा प्रस्ताव आर्थिक व प्रशासकीय मंजूरीस्तव सादर.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

नमुना क्र. १०

नियम ३० (३) पहा

अन्वये लेखाशिर्ष पुनर्विनयोजनाचे विवरण पत्र

| या लेखा शिर्षातून | | | | | | या लेखा शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान गौण शिर्ष | जनसंपर्क विभाग | मुळ अनुदान | आज पर्यंतचा खर्च | उपबल्ध शिल्लक | प्रधान गौण व तपशीलवार माहीती | सण उत्सव समारंभ | मुळ अनुदान | आज तारखेपर्यंत झालेला खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम खर्च | अभिप्राय |
| १ | अ बजेट महसुली खर्च | निविदा व जाहीरात प्रसिध्दी ईत्यादी खर्च पानं नं. १९ | १,५०,००,००० | ५६,०१,६८८/- | ९३,९८,३१२ | अ बजेट महसुली खर्च पान नं. ३२ | सण व उत्सवावर खर्च | [illegible],००,०००/- | ७,९६,९६०/- | ४५,००,००० | केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडील परिपत्रकानुसार हर घर [illegible] उपक्रम, मेटल बॅच ध्वज खरेदी करणे |
| | | | | | | | | | | | |

जनसंपर्क अधिकारी | उपायुक्त (मु) | लेखा व वित्त अधिकारी | अतिरीक्त आयुक्त | आयुक्त

# भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका,भिवंडी.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २४४,२४५,३८६,३९२ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३, महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियम १९९५ व तत्कालिन मा.आयुक्त सो,यांनी ठरवून दिलेल्या दरानुसार (दरसुची सोबत जोडली आहे) प्रत्येक आस्थापनांवर २५ चौ.फु.पर्यंत दुकानांचे नांवाचे फलक नि:शुल्क असुन त्या व्यतिरिक्त दुकानांचे अन्य फलक अगर /जाहीरात लागली असल्यास त्यावर महानगरपालिकेच्या नियमानुसार मंजूर मा.महासभा ठराव क्र.०५,दिनांक २४/०७/२०१७ अन्वये रस्त्यांच्या दर्जा नुसार जाहीरात फी भरणे अनिवार्य आहे.

भिवंडी नि.श.महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रांमध्ये सुमारे ३० हजार आस्थापना (दुकाने/व्यवसाय इ.) असल्याचा अंदाज आहे.त्यावर प्रत्येक आस्थापनाचे किमान शुल्क रु.१०००/- प्रती आस्थापना धरल्यास ,त्यापासून मनपास सुमारे रु.३,००,००,०००/- (रु.३ कोटी) वार्षिक उत्पन्न अपेक्षित आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या दि. २१ जुन २०१४ चे परीपत्रकानुसार महानगरपालिकेने ठरविलेले दर निश्चित करुन त्यानुसार जाहीरात फी आकारता येईल.

त्यानुसार सदर आस्थापनांचा सर्व्हे करणे कामी अभिकर्ता यांनी जाहीरात फलकाचा सर्व्हे करून त्याच मनपा सुची नुसार जाहीरात फी करीता मनपाने ठरविलेल्या नमुन्यानुसार संबंधीत जाहीरांत धारकांस नोटीस बजावुन महाराष्ट्र शासनाचे दिनांक २१ जुन २०१४ चे परीपत्रकातील मुद्दा क्र.१७ अन्वये व्यावसायिक ठिकाणी असलेल्या जाहीरातींना परवानगी दिली जाईल व ते विनियमीत केले जाईल .मुद्दा क्र.२६ अन्वये ते दर वर्षी नुतनीकरण करण्यांत येतील.जाहीरात कर वसुल करणेत येईल.

यामध्ये जादा असलेल्या जाहीरातीचा सर्व्हे करुन त्यानंतर जाहीरात फी वसुल करुन अभिकर्ता यांनी टक्केवारी पध्दतीने रक्कम अदा करण्याच्या अटीवर अभिकर्ता नेमावा.त्यासाठी सदर कामी मनपास सर्व्हेचा खर्च होणार नाही व अभिकर्ता मार्फत जाहीरात फी वसुल होईल.सबब कामी अभिकर्ता नेमणे कामी ई-निविदा प्रसिध्द करणेस प्रशासकिय मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव.

**ठराव क्रमांक :** 02 **दिनांक :** 25/०७/२०२२.

भिवंडी निजा.शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रांतील दुकाने,हॉस्पीटल,हॉटेल इ.आस्थापनांवर लागलेल्या एक नामफलक व्यतिरिक्त जादा लागलेल्या नामफलक व इतर जाहीराती लागल्यास त्यावर जाहीरात फी आकारणी करणेकामी व सर्व आस्थापनांचा सर्व्हे करुन माहिती संकलित करणे तसेच उक्त जाहीरात शुल्क वसुली करणेकामी अभिकर्ता नेमण्यांस ई-निविदा मागविणेस मंजूरी मिळणेस प्रस्ताव सादर केलेला आहे.

महानगरपालिकेचे उत्पन्नचा स्त्रोत हा साधन असल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६६ अ नुसार महापालिकेस निश्चित उत्पन्नाची हमी मिळणेकरीता मला प्राप्त महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१(भाग २)/ नवि.१४,दि.०६ जुन,२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब)

मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक,भिवंडी निजा.शहर महानगरपालिका, जाहीरात विभाग प्रमुख,मुख्य लेखा परिक्षक,मुख्य लेखा व वित्त अधिकारी व उप-आयुक्त (जाहीरात) व अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार भिवंडी निजा.शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रांतील दुकाने,हॉस्पीटल,हॉटेल इ.आस्थापनांवर लागलेल्या एक नामफलक व्यतिरिक्त जादा लागलेल्या नामफलक व इतर जाहीराती लागल्यास त्यावर जाहीरात फी आकारणी करणेकामी व सर्व आस्थापनांचा सर्व्हे करुन माहिती संकलित करणे तसेच उक्त जाहीरात शुल्क वसुल करणेकामी अभिकर्ता नेमणेबाबत ई-निविदा मागविणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

**( विजयकुमार म्हसाळ )**
**प्रशासक,**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.**

**विषय :- चाविंद्रा-रामनगर डंपीग ग्राऊड येथे कचरा ढिग लेव्हल करणेसाठी पोकलन मशीन भाडे तत्वावर घेणेसाठी होणा-या खर्चास मा.प्रशासक यांची मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्तावना**

शहरात निर्माण होणा-या कच-याची विल्हेवाट सद्या चाविंद्रा-रामनगर येथील मनपाच्या जागेत लावण्यात येते या ठिकाणी दररोज 400 ते 450 टन कचरा टाकला जात असल्याने कच-याचे मोठ्या प्रमाणात ढीग निर्माण होवुन कचरा वाहने आत पर्यंत जाण्यास अडथळे निर्माण होतात.तसेच कचरा ढिंगामुळे दुर्गधी निर्माण होवुन चाविंद्रा सभोवतालच्या परिसरात असणा-या नागरिकांच्या सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण पोहचण्याची शक्यता असते.या करिता पोकलन मशीनची आवश्यकता भासते.

सद्यास्थिती कचरा सपाटीकरणासाठी भाडेतत्वावरील 1 पोकलन मशीन व 1 चैनवाला बुलडोझर कार्यरत असून मा.महासभा ठराव क्र.49,दि.29/06/2015 अन्वये दिलेल्या मान्यते नुसार घनकचरा व्यवस्थापना कामी नविन ठेकेदार नियुक्त करण्याच्या निविदा अंतिम होई पर्यंत इच्छुक पुरवठाधारकाकडुन घेण्यात आलेली साधन सामग्री व चैनवाला बुलडोझर यांना पुढील आदेश होई पर्यंत कार्यादेश निर्गमित करण्यात आला असल्याने सदर चैनवाला बुलडोझरची मुदतपण संपुष्टात येणार आहे.

शहरातुन दररोज निघणारा कच-याची विल्हेवाट योग्यरित्या व मुदतीत करणे आवश्यक असल्याने दैनंदिनरित्या लावणेकामी डंपिग ग्राउंड येथे भाडेतत्वावरील पोकलन मशीन सदर कामाची मुदत दि.07/07/2022 रोजी संपुष्टात येणार असल्याने त्या अगोदर पोकलन मशीन कार्यरत होणे आवश्यक असुन पुढील कालावधीत येणारे सण पाहता डंपीग ग्राऊंड येथे कचरा वाढण्याचे प्रमाणात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे पोकलन मशीनची नितांत आवश्यकता आहे.

तथापि यापुर्वी निविदे द्वारे प्रति दिन रु.13,253/- (इंधन,चालक व क्लिनरसह) इतका खर्च येत असुन सदरचे काम अति-तात्काळ व डंपीग ग्राऊड लगतच्या स्थानिक नागरिकांच्या आरोग्याशी निगडित असल्याने तात्काळ करुन घेणे आवश्यक असुन माहे जुलै 2022 या कालावधी नंतर सार्वजनिक सण येणार असल्याने कच-या मध्ये वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी 265 दिवसा करिता प्रति दिन रु.13,253/- या दरानुसार रु.35,12,045/- इतका खर्च येत असुन सद्यास्थिती मा.महासभा अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक तथा आयुक्त यांची मान्यता मिळावी.

**प्रशासकीय ठराव क्र.** 03 **दिनांक** 24/06/2022

चाविंद्रा-रामनगर डंपीग ग्राऊड येथे कचरा ढिग लेव्हल करणेसाठी पोकलन मशीन भाडे तत्वावर घेणेसाठी होणा-या खर्चास मा.प्रशासक यांची मान्यता मिळणे बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्ताव सादर केलेला आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ2020/प्र.क्र.71(भाग2)/नवि दि.06 जुन 2022 नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 452 अ (1अ) व (1ब) च्या तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका चाविंद्रा-रामनगर डंपीग ग्राऊड येथे कचरा ढिग लेव्हल करणेसाठी पोकलन मशीन भाडे तत्वावर सन 2022-2023 या आर्थिक वर्षात घनकचरा व्यवस्थापन या लेखा शिर्षका खाली रु.14 कोटी 99 लक्ष मात्र तरतुद करण्यात आली असुन सदर तरतुद निधी मधुन 265 दिवसा करिता पोकलन मशीन भाडेतत्वावर घेणे करिता रु.35,12,045/- इतका होणा-या खर्चास मान्यता देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी
## बांधकाम विभाग,

**विषय :- स्व. मिनाताई ठाकरे नाट्यगृहाचे नुतनीकरण करणे.**

प्रभाग समिती क्र.०५ च्या कार्यक्षेत्रातील स्व. मिनाताई ठाकरे नाट्यगृह नादुरूस्त स्थितीत असून गेले काही वर्षा पासून बंदस्थितीत असलेले नाट्यगृहाचीविर जिजामाता टेक्नॉलॉजिकल इन्स्टीट्युट (VJTI)यांचे कडून संरचनात्मक परिक्षण (Structural audit) करून घेण्यात आले असून त्याप्रमाणे सुचविलेल्या दुरुस्तीचा प्रस्ताव तांत्रिक सल्लागार **मे अजय ठाकूर अँड असोसिएट्स** यांच्या कडून करून घेण्यात आलेला आहे. उक्त प्रस्तावानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये १०.५७ कोटी चे तयार करण्यात आलेले असून त्यास तांत्रिक मान्यता मिळालेली आहे. उक्त प्रस्तावास महाराष्ट्र राज्य शासनाकडून पत्र क्र. मनपा /२०२०/प्र.स.०३/नवि-१६ दिनांक १८ जानेवारी २०२० नुसार नगर विकास विभागाकडून मुलभूत सोयी सुविधांचा विकास अंर्तगत एकूण रक्कम रुपये १० कोटी निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

त्याअनुषंगाने कंसल्टंट यांनी प्रस्ताव मंजूरीसाठी सादर केलेनंतर प्रस्तावास विहित मान्यता घेण्यात आलेली आहे. तसेच सदर प्रस्तावास मा. महासभा ठराव क्र. २८७ दिनांक १२/०३/२०२१ अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे.

त्यानुसार सदर कामी ई-निविदा सुचना क्र ४४ (७८९२८१) नुसार राष्ट्रीय स्तरावरिल इकॉनॉमिक टाईम्स, नवभारत टाईम्स महाराष्ट्र टाईम्स या वृत्त पत्रात दिनांक ०८/०४/२०२२ रोजी ई-निविदा मागविणेबाबत जाहिरात प्रसिद्ध केलेली होती. सदर निविदा प्राप्त करणे कामी दिनांक ०९/०५/२०२२ ही शेवटची तारीख दर्शवण्यात आलेली होती. सदर कामाच्या निविदेतील तांत्रिक लिफाफा क्र. १ उघडण्यात आला असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

**खालील तक्त्यानुसार सहा निविदा प्राप्त झालेल्या आहेत.**

१ अॅकॉर्ड असोसिएट्स, उल्हासनगर
२ ईगल इन्फ्रा. प्रायव्हेट लि., उल्हासनगर
३. महेंद्र रियालटर्स,मालाड मुंबई
४. आर. अँड के. इन्फ्रा.,नाशिक
५. मे. बुबेरे ॲड असोसिएट्स, भिवंडी
६. झा. पी. ॲड कंपनी ,उल्हासनगर

उपरोक्त कामी सहा निविदा प्राप्त झालेल्या असून मनपाने नेमलेले तांत्रिक सल्लागार मे. अजय ठाकूर ॲड असोसिएट्स यांनी टेक्नीकल बीड तपासून छाननी अंती चार निविदा पात्र असल्याचे कळविलेले आहे. त्या खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| १ अॅकॉर्ड असोसिएट्स, उल्हासनगर | पात्र |
| २ ईगल इन्फ्रा. प्रायव्हेट लि., उल्हासनगर | पात्र |
| ३. महेंद्र रियालटर्स,मालाड मुंबई | पात्र |
| ४. आर. अँड के. इन्फ्रा.,नाशिक | पात्र |
| ५. मे. बुबेरे ॲड असोसिएट्स, भिवंडी | अपात्र |
| ६. झा. पी. ॲड कंपनी ,उल्हासनगर | अपात्र |

त्यानुसार याकामी पात्र निविदाकार यांचे दिनांक २६/०६/२०२२ रोजी लिफाफा क्र.०२ उघडण्यात आलेले असून त्याबाबतचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १ अॅकॉर्ड असोसिएट्स,उल्हासनगर | अंदाजपत्रकिय दरापेक्षा १३.९५० टक्के जादा दराने |
| २ ईगल इन्फ्रा. प्रायव्हेट लि., उल्हासनगर | अंदाजपत्रकिय दरापेक्षा ३०.६० टक्के जादा दराने |
| ३. महेंद्र रियालटर्स,मालाड मुंबई | अंदाजपत्रकिय दरापेक्षा १६.७० टक्के जादा दराने |

४. आर. अँड के. इन्फ्रा.नाशिक अंदाजपत्रकिय दरापेक्षा १२ टक्के कमी दराने

**मे.आर. अँड के. इन्फ्रा.नाशिक** यांची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा १२ टक्के कमी दराची म्हणजेच एकूण रक्कम रुपये ९,३०,८१,६४८/- (नऊ कोटी तीस लाख ऐक्केऐंशी हजार सहाशे अठ्ठेचाळिस रुपये मात्र) ची सर्वात कमी दराची आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-2 दि.२७/०९/२०१८नुसार जी. निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १० टक्के कमी दराची असेल अशा वेळेस सदर कमी दराची निविदा कमी दराने अतिरिक्त अनामत रक्कम मनपाकडे भरण्याचे नमुद आहे. त्यास शहर अभियंता, मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी व अति. आयुक्त यांनी शिफसरस केलेली आहे.

सदर कमी दराच्या निविदेतील दरांना मान्यता घेणे व संविदा करणेचे अधिकार मा. स्थायी समितीला आहेत मात्र सद्यास्थितीत मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नाही.

शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.-७१(भाग-२)नवि-१४दिनांक ०६ जून २०२२ नुसार मा. महासभा व मा. स्थायी समितीअस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा कारभार हे प्रशासक पहात आहेत, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) नुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

स्व. मिनाताई ठाकरे नाट्यगृहाचे नुतनीकरण करणे कामी मे. आर. अँड के. इन्फ्रा. नाशिक यांची सर्वात कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकिय दरापेक्षा १२ टक्के कमी दराची ९,३०,८१,६४८/- नुसार महाराष्ट्र अधिनियम ७३ (क) नुसार संविदा मंजूरी देणेचा प्रस्ताव.

**ठराव क्रमांक :** ०४ **दिनांक :** 25/07/2022.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या स्व. मिनाताई ठाकरे नाट्यगृहाचे नुतनीकरण करणेकामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे. आर अँड के इन्फ्रा. नाशिक यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा १२ टक्के कमी दराची म्हणजे एकूण रक्कम रुपये ९,३०,८१,६४८/- (नऊ कोटी तीस लाख ऐक्केऐंशी हजार सहाशे अठ्ठेचाळिस रुपये मात्र ) ची निविदा मंजूरीस शहर अभियंता, मुख्य लेखा परिक्षक,मुख्य लेखा व वित्त अधिकारी व अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ 2020/प्र.क्र.71(भाग 2)/ नवि.14,दि.06 जुन,2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका स्व. मिनाताई ठाकरे नाट्यगृहाचे नुतनीकरण करणेकामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे. आर अँड के इन्फ्रा. नाशिक यांचे बरोबर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा करणेस मंजूरी देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि. शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

बांधकाम विभाग

प्रस्तावना :-

**विषय :- भिवंडी नि.श.महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्रं.१ अंतर्गत वॉर्ड क्रं.२ रिवेरा पाम सोसायटी ते न्यु फरीदबाग व मिल्लतनगर परिसरात व इतर ठिकाणी गटार तयार करणे.( अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम सन २०२१-२२)**

भिवंडी नि.श.महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्रं.१ अंतर्गत वॉर्ड क्रं.२ रिवेरा पाम सोसायटी ते न्यु फरीदबाग व मिल्लतनगर परिसरात व इतर ठिकाणी गटार तयार करणेकामी रु. ४९,९४,२९१/- मात्रच्या प्रस्तावास मा.जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांचेकडील प्रशासकीय मान्यतेचा आदेश क्रं. सामान्य/नि.क्र.-२/अल्पसंख्यांक/भिनिशमनपा/प्र.मा./कावि./६६७/२०२२ दिनांक ०३/०६/२०२२ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळालेली आहे. सदर कामाची रक्कम रु. ४९,९४,२९१/- मात्रची ई निविदा सुचना क्रं.८५/२०२२-२३ (१ काम) इकॉनॉमी टाईम्स,महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या www mahatenders.gov.in देवुन या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई-निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी एकुण पात्र २ निविदा पैकी मे.बुबेरे ॲण्ड असोसिएटसं, भिवंडी यांनी दिलेला देकार न्युनतम असुन अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच रक्कम रु. ४९,९४,२९१/- येत आहे.

मे.बुबेरे ॲण्ड असोसिएटस,भिवंडी यांची अंदाजपत्रकीय दराची रक्कम रु. ४९,९४,२९१/- (अक्षरी रु.एकोनपन्नास लाख चव-यांनवद हजार दोनशे एक्यांनवद मात्र) च्या खर्चाची निविदा संविंदा करणेकामीच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक २०/०६/२०२२ रोजी पूर्वमान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासक मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रं.:- ०५          दिनांक :- २५/०७/२०२२

भिवंडी नि.श.महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्रं.१ अंतर्गत वॉर्ड क्रं.२ रिवेरा पाम सोसायटी ते न्यु फरीदबाग व मिल्लतनगर परिसरात व इतर ठिकाणी गटार तयार करणेकामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.बुबेरे ॲण्ड असोसिएटस,भिवंडी, जि.ठाणे यांची अंदाजपत्रकीय दराची रक्कम रु. ४९,९४,२९१/- (अक्षरी रु.एकोनपन्नास लाख चव-यांनवद हजार दोनशे एक्यांनवद मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषतः कलम ४५२ अ (१अ) मधील तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी नि.श.महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्रं.१ अंतर्गत वॉर्ड क्रं.२ रिवेरा पाम सोसायटी ते न्यु फरीदबाग व मिल्लतनगर परिसरात व इतर ठिकाणी गटार तयार करणे कामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.बुबेरे ॲण्ड असोसिएटस,भिवंडी जि.ठाणे यांचे सोबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
**प्रशासक,**
भिवंडी नि.श.महानगरपालिका

८८

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी

**विषय :-भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभाग अंतर्गत दिव्यांग व्यक्तींकरीतासन २०२२-२३ मध्ये राबविण्यात येणा-या योजना,लाभार्थी संख्या व रक्कम निश्चित करून व त्यास मा.प्रशासनाची मान्यता मिळणेबाबत.**

**संदर्भ :-१.नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.५२/१८/नवि-२८, दि.१०मे,२०१८**
**२. नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१५/प्र.क्र.११८/नवि-२०, दि.२८ऑक्टोबर, २०१५**

## प्रस्तावना

महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये दिव्यांग कल्याण योजना या शिर्षाखाली सन २०२२-२३ करिता रु. ८७.०२ लक्ष इतका निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे. त्यानुसार उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या मुद्यांच्या अधिन राहून तसेच मा. उपआयुक्त सो. (समाज कल्याण) व मा. सहाय्यक आयुक्त सो. (समाज कल्याण) यांचेशी झालेल्या चर्चेनुसार सन २०२२-२३ मध्ये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभाग अंतर्गत दिव्यांग कल्याण या शिर्षाखाली राबविण्यात येणा-या योजना व करावयाच्या कामांचे नियोजन करण्यात आले असून ते खालीलप्रमाणे आहे.

**खालील १ ते १० योजनांकरीता आवश्यक कागदपत्रे तसेच अटी व शर्ती**

१)कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न रु.१,००,०००/- पर्यंत असलेबाबत तहसिलदार, भिवंडी यांचे कडील दाखला
२) अर्जदाराचे वय १८ पेक्षा जास्त असावे.
३) दिव्यांग व्यक्ती शासकीय किंवा निमशासकीय सेवेत कार्यरत असल्यास त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही.
४) दिव्यांग व्यक्तींनी महानगरपालिका समाज कल्याण विभागात नोंदणी करणे आवश्यक आहे.
५) ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी दिलेले दिव्यांग प्रमाणपत्र, तहसिलदार, भिवंडी यांचेकडीलरहिवासी दाखला, मतदान ओळखपत्र, शिधापत्रिका, बँक पासबुक, घरपट्टी/पाणीपट्टी कर संपुर्ण कर भरलेबाबतच्या पावतीची छायांकित प्रत, भाड्याने राहत असल्यास भाडेकरार/भाडेपावती.
६) भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पत्त्याची नोंद दिव्यांग विद्यार्थी/दिव्यांग व्यक्ती यांचे आधारकार्डावर असणे आवश्यक आहे.

| अ. क्र | योजना व करावयाची कामे | लाभाचे स्वरुप | लाभार्थी संख्या | त्यासाठी लागणारा निधी |
|---|---|---|---|---|
| १ | दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण/उच्च शिक्षण तसेच दिव्यांग खेळाडुंकरीता(जिल्हास्तर/ राज्यस्तर/आंतरराष्ट्रीयस्तर) शिष्यवृत्ती देणे. | **विद्यार्थ्यांचे शिक्षण स्तर**<br>इयत्ता १ ली ते ४ थी- रु.३,०००/- प्रती वर्ष<br>इयत्ता ५ वी ते ७ वी- रु.४,०००/- प्रती वर्ष<br>इयत्ता ८ वी ते १० वी- रु.५,०००/- प्रती वर्ष<br>इयत्ता ११ वी ते १२ वी- रु. ७,०००/- प्रती वर्ष<br>इयत्ता १३ वी ते पदवी - रु.१०,०००/- प्रती वर्ष | <br>५<br>५<br>५<br>५<br>५ | रु.१,४५,०००/- |
| | | **खेळाडूंकरिता स्पर्धेचे स्तर**<br>जिल्हास्तर- रु.११,०००/- प्रती वर्ष<br>राज्यस्तर- रु.१२,०००/- प्रती वर्ष<br>राष्ट्रीयस्तर- रु.१३,०००/- प्रती वर्ष<br>आंतरराष्ट्रीयस्तर- रु.१५,०००/- प्रती वर्ष | <br>०१<br>०१<br>०१<br>०१ | रु.५१,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सदर योजनेकरीता तक्त्याच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) मुख्यध्यापक किंवा प्राचार्य यांचे शाळा/महाविद्यालयात शिक्षण घेत असलेबाबतचे प्रमाणपत्र ८) खेळाडुंनी उपरोक्त अटींसोबत खेळामध्ये प्रवेश घेतल्याबाबत/निवड झाल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सादर करावे. ९) विद्यार्थ्यांचे वय १८ वर्षापेक्षा कमी असल्यास त्यांच्या आईच्या बॅक खात्यात सदरची रक्कम जमा करण्यात येईल. | | | |
| २ | दिव्यांगाना उत्पनाच्या अटींवर घरासाठी/घर दुरुस्ती करणेकामी अर्थसहाय्य देणे | रु.५०,०००/- | ०४ | रु.२,००,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्त्याच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) सद्यस्थितित व यापूर्वी स्वत:चे कुठेही घर नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्रक सादर करावे. ८) स्वत:च्या जागेत घर बांधणार असल्यास दिव्यांग व्यक्तींच्या किंवा घरातील कुटुंबातील नात्यातील व्यक्तीच्या नावे सातबारा/जागेशी संबंधीत पुरावे, ना हरकत दाखला, बांधकामाचे दरपत्रक (कोटेशन). | | | |

| अ. क्र. | योजना व करावयाची कामे | लाभाचे स्वरुप | लाभार्थी संख्या | त्यासाठी लागणारा निधी |
|---|---|---|---|---|
| ३ | दिव्यांगाना व्यवसाय करण्याकरीता अर्थसहाय्य देणे | रु.५०,०००/- | ५० | रु.२५,००,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्त्याच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) व्यवसाय करणेकामी साहित्य खरेदीबाबतचे दरपत्रक ८) व्यवसायाच्या जागेची कर पावती, जागा मालकाचे नाहरकत प्रमाणपत्र व भाडेकरार, भाडेपावती सादर करावी. ९) आवश्यक परवाना पत्रे/शॉप ॲक्ट लायसन्स (गुमास्ता/उधोग आधार) सादर करावा. १०) अर्जदार बेरोजगार असलेबाबतचे प्रतिज्ञापत्रक. ११) मनपाने ज्या दिव्यांग व्यक्तींना व्यवसायासाठी कॅबीन उपलब्ध करून दिलेले आहेत त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. १२) ४० टक्के ते ८० टक्के दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग व्यक्तींस या योजनेचा लाभ घेता येईल. | | | |
| ४ | दिव्यांगाच्या वैद्यकीय खर्चाकरीता अर्थसहाय्य देणे | रु.५०,०००/- | ०४ | रु.२,००,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्त्याच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) शासकीय रुग्णालयात सेवा उपलब्धनसल्यास शासकीय वैद्यकिय अधिका-यांनी खाजगी रुग्णालयात पाठविलेबाबतचे पत्र. ८) वैद्यकिय खर्चाची मुळ देयके सादर करणे. | | | |
| ५ | दिव्यांगांच्या बचत गटाना अर्थसहाय्य देणे | रु. १,२०,०००/- | २ | रु.२,४०,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्त्याच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) बचतगट स्थापने बाबतची ठरावाची प्रमाणित प्रत. ८) बचत गटाने नोंदणी प्रमाणपत्र जोडणे. ९) बचत गटातील सर्व सभासदांनी फोटो व स्वाक्षरीची यादी जोडावी. | | | |
| ६ | दिव्यांगांच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे | रु.५०,०००/- | २ | रु.१,००,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्त्याच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) दिव्यांग व्यक्तींचे विवाह शासकीय विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे. ८) विवाहानंतर नावात बदल केल्याबाबतचे गॅझेट सादर करावे. ९) विवाह झाल्यानंतर किमान १ वर्षात या योजनेचा लाभ देण्यात येईल. १०) विवाहित वधू व वराचा प्रथम विवाह असावा, वधू अथवा वर घटस्फोटीत असल्यास अशा प्रकारची मदत यापुर्वी घेतलेली नसावी. | | | |
| ७ | १८ वर्षावरिल दिव्यांगांना उदरनिर्वाह करीता अनुदान देणे. | प्रती माह रु.२,०००/- | ९० | रु.२१,६०,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्त्याच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) मनपाने ज्या दिव्यांग व्यक्तींना व्यवसायासाठी कॅबीन उपलब्ध करून दिलेले आहेत त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. ८) दर वर्षी अर्ज सादर करणे आवश्यक आहे. ९) ८० टक्के ते १०० टक्के दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग व्यक्तींस या | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | योजनेचा लाभ घेता येईल. १०) दिव्यांग व्यक्तींस सदर योजनेचा लाभ प्रत्येक आर्थिक वर्षात माहे एप्रिल ते माहे मार्चपर्यंतचा देण्यात येईल. | | | |
| ८ | कुष्ठरुग्णांना अनुदान देणे | प्रती माह रु. २,०००/- | १० | रु.२,४०,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) कुष्टपिडीत व्यक्तींना सदर योजनेचा लाभ प्रत्येक आर्थिक वर्षात माहे एप्रिल ते माहे मार्चपर्यंतचा देण्यात येईल. ८) दर वर्षी अर्ज सादर करणे आवश्यक आहे. ९) कुष्ठपिडीत कारणास्तव किमान ४० टक्के व त्यापेक्षा जास्त कार्यात्मक/क्रियात्मक (Functional) असलेबाबत जिल्हा शल्य चिकीस्तक यांचे रुग्णालयाकडील प्रमाणपत्र. | | | |
| ९ | दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणीक साहीत्य /सहाय्यक उपकरणे खरेदीकामी अनुदान | प्रती लाभार्थी रु.२५,०००/- | १६ | रु.४,००,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांचे शाळा/महाविद्यालयात शिक्षण घेत असलेबाबतचे प्रमाणपत्र. ८) ज्या साहित्याची आवश्यकता आहे त्या साहित्याचे दरपत्रक/कोटेशन. | | | |
| १० | दिव्यांग व्यक्तींस सहाय्यकउपकरणेखरेदी करणेकामी अनुदान देणे. | प्रती लाभार्थी रु.२५,०००/- | २० | रु.५,००,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) ज्या साहित्याची आवश्यकता आहे त्या साहित्याचे दरपत्रक/कोटेशन. | | | |

**भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींकरीता सामुदायीकरिता राबविण्यात येणा-या योजना व इतरे करावयाची कामे.**

| अ. क्र. | योजना व करावयाची कामे | लाभाचे स्वरुप | लाभार्थी संख्या | त्यासाठी लागणारा निधी |
|---|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींकरीता थेरपी सेंटर निर्माण करुन त्याठिकाणी थेरपी साहित्य उपलब्ध करून देणे. | रु. ५,००,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु.५,००,०००/- |
| २ | महानगरपालिका सार्वजनिक वाचनालयामध्ये दिव्यांग व्यक्तींकरीता ऑडिओ लायब्ररी निर्माण करणे. | रु.१०,००,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु.१०,००,०००/- |
| ३ | दिव्यांगाच्या क्रिडा, चित्रकला, हस्तकला इ. स्पर्धा आयोजित करणे. | रु. २,००,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु.२,००,०००/- |
| ४ | दिव्यांगांच्या कल्याणार्थ राबविण्यात येणा-या योजनांचा प्रचार/प्रसार करणे. | रु.१,००,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु. १,००,०००/- |
| ५ | उपरोक्त व्यतिरिक्त तिथल्या स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक असलेल्या महात्वाकांशी योजना अमंलात आणणे. | | | रु.१,६६,०००/- |
| | **एकूण रक्कम** | | | **रु. ८७,०२,०००/-** |

उपरोक्त योजनाकरिता प्रथम येणा-या अर्जदारास प्रथम प्राध्यान्य या तत्त्वावर लाभ देण्यात येतील. त्यानंतर मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांच्या मान्यतेने दिव्यांगत्वाच्या टक्केवारीनुसार लाभ देण्यात येतील. एका दिव्यांग व्यक्तीस वरीलपैकी कोणत्याही एकाच आर्थिक लाभाच्या योजनेचा लाभ घेता येईल. प्राप्त होणारे अर्ज स्विकारणे अथवा नाकारण्याचे संपुर्ण अधिकार मा.

प्रशासक तथा आयुक्त सो. यांना राहतील. तसेच या योजनांकरिता दरवर्षी दिव्यांग कल्याण करिता राखीव असलेली अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेऊन लाभार्थी संख्या निश्चीत करण्यात येईल.

तरी महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये दिव्यांग कल्याण विभागाकरिता राखीव असलेल्या निधीतून वरिलप्रमाणे योजना व कामे करणेकामीचा प्रस्ताव मा. प्रशासक तथा आयुक्त सो. मंजुरीस्तव प्रस्तावित करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक :** ६ **दिनांक : २८/०७/२०२२.**

केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे अपंग व्यक्तींच्या कल्याणासाठी अपंग व्यक्तींसाठी समान संधी,संरक्षण व समान सहभाग कायदा,1995,दि.01.01.1996 पासून लागू केलेला असून,अपंग व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यांत आलेल्या 3% निधी नागरी भागातील अपंगांसाठी खर्च करण्यांकरीता शासन निर्णय क्र.सकिर्ण -2015/प्र.क्र.118/वि-20,दि. 28 मे 2015 रोजीच्या मार्गदर्शक सूचना दिलेल्या असून,सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी अपंगांसाठी दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिका/नगरपालिकांमध्ये दिव्यांगांसाठी किमान 3%निधी राखीव ठेवणे व खर्च करणेबाबत स्पष्ट निर्देश आहेत व दिलेल्या प्रयोजनार्थ हा निधी खर्च करावयाचा आहे. त्याअनुषंगाने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभाग अंतर्गत दिव्यांग व्यक्तींकरीता सन २०२२-२३ मधील अर्थसंकल्पातील तरतूदीनुसार 3% निधीमधून खालील प्रमाणे नमूद केलेल्या,राबविण्यात येणा-या योजना,लाभार्थी संख्या व रक्कम निश्चित करून व त्यास प्रशासनाची मान्यता मिळणेबाबत सादर केलेल्या प्रस्तावनुसार नमुद तक्त्यातील अ.क्र.1 ते 10 व 1 ते 5 च्या योजना राबविणे आवश्यक असल्याने आहे.सदर योजनांसंदर्भात प्रथम येणा-या अर्जदारास प्रथम प्राध्यान्य या तत्त्वावर लाभ देण्यात येतील. त्याकामी लागणारा निधी व स्वरूप खालील तक्त्यांत नमुद केल्यानुसार पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | योजना व करावयाची कामे | लाभाचे स्वरुप | लाभार्थी संख्या | त्यासाठी लागणारा निधी |
|---|---|---|---|---|
| १ | दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण/उच्च शिक्षण तसेच दिव्यांग खेळाडुंकरीता(जिल्हास्तर/ राज्यस्तर/आंतरराष्ट्रीयस्तर) शिष्यवृती देणे. | **विद्यार्थ्यांचे शिक्षण स्तर**<br>इयत्ता १ ली ते ४ थी- रु.३,०००/- प्रती वर्ष<br>इयत्ता ५ वी ते ७ वी- रु.४,०००/- प्रती वर्ष<br>इयत्ता ८ वी ते १० वी- रु.५,०००/- प्रती वर्ष<br>इयत्ता ११ वी ते १२ वी- रु. ७,०००/- प्रती वर्ष<br>इयत्ता १३ वी ते पदवी - रु.१०,०००/- प्रती वर्ष | <br>५<br>५<br>५<br>५<br>५ | रु.१,४५,०००/- |
| | | **खेळाडूंकरिता स्पर्धेचे स्तर**<br>जिल्हास्तर- रु.११,०००/- प्रती वर्ष<br>राज्यस्तर- रु.१२,०००/- प्रती वर्ष<br>राष्ट्रीयस्तर- रु.१३,०००/- प्रती वर्ष<br>आंतरराष्ट्रीयस्तर- रु.१५,०००/- प्रती वर्ष | <br>०१<br>०१<br>०१<br>०१ | रु.५१,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) मुख्यध्यापक किंवा प्राचार्य यांचे शाळा/महाविद्यालयात शिक्षण घेत असलेबाबतचे प्रमाणपत्र ८) खेळाडुंनी उपरोक्त अटींसोबत खेळामध्ये प्रवेश घेतल्याबाबत/निवड झाल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सादर करावे. ९) विद्यार्थ्यांचे वय १८ वर्षापेक्षा कमी असल्यास त्यांच्या आईच्या बॅक खात्यात सदरची रक्कम जमा करण्यात येईल. | | | |
| २ | दिव्यांगाना उत्पनाच्या अटींवर घरासाठी/घर दुरुस्ती करणेकामी अर्थसहाय्य देणे | रु.५०,०००/- | ०४ | रु.२,००,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) सद्यस्थितित व यापूर्वी स्वत:चे कुठेही घर नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्रक सादर करावे. ८) स्वत:च्या जागेत घर बांधणार असल्यास दिव्यांग व्यक्तींच्या किंवा घरातील कुटुंबातील नात्यातील व्यक्तीच्या नावे सातबारा/जागेशी संबंधीत पुरावे, ना हरकत दाखला, बांधकामाचे दरपत्रक (कोटेशन). | | | |

| अ. क्र. | योजना व करावयाची कामे | लाभाचे स्वरुप | लाभार्थी संख्या | त्यासाठी लागणारा निधी |
|---|---|---|---|---|
| ३ | दिव्यांगाना व्यवसाय करण्याकरीता अर्थसहाय्य देणे | रु.५०,०००/- | ५० | रु.२५,००,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती<br>७) व्यवसाय करणेकामी साहित्य खरेदीबाबतचे दरपत्रक ८) व्यवसायाच्या जागेची कर पावती, जागा मालकाचे नाहरकत प्रमाणपत्र व भाडेकरार, भाडेपावती सादर करावी. ९) आवश्यक परवाना पत्रे/शॉप ॲक्ट लायसन्स (गुमास्ता/उधोग आधार) सादर करावा. १०) अर्जदार बेरोजगार असलेबाबतचे प्रतिज्ञापत्रक. ११) मनपाने ज्या दिव्यांग व्यक्तींना व्यवसायासाठी कॅबीन उपलब्ध करून दिलेले आहेत त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. १२) ४० टक्के ते ८० टक्के दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग व्यक्तींस या योजनेचा लाभ घेता येईल. | | | |
| ४ | दिव्यांगाच्या वैद्यकीय खर्चाकरीता अर्थसहाय्य देणे | रु.५०,०००/- | ०४ | रु.२,००,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती<br>७) शासकीय रुग्णालयात सेवा उपलब्धनसल्यास शासकीय वैद्यकिय अधिका-यांनी खाजगी रुग्णालयात पाठविलेबाबतचे पत्र. ८) वैद्यकिय खर्चाची मुळ देयके सादर करणे. | | | |
| ५ | दिव्यांगांच्या बचत गटाना अर्थसहाय्य देणे | रु. १,२०,०००/- | २ | रु.२,४०,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती<br>७) बचतगट स्थापने बाबतची ठरावाची प्रमाणित प्रत. ८) बचत गटाने नोंदणी प्रमाणपत्र जोडणे. ९) बचत गटातील सर्व सभासदांनी फोटो व स्वाक्षरीची यादी जोडावी. | | | |
| ६ | दिव्यांगांच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे | रु.५०,०००/- | २ | रु.१,००,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती<br>७) दिव्यांग व्यक्तींचे विवाह शासकीय विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे. ८) विवाहानंतर नावात बदल केल्याबाबतचे गॅझेट सादर करावे. ९) विवाह झाल्यानंतर किमान १ वर्षात या योजनेचा लाभ देण्यात येईल. १०) विवाहित वधू व वराचा प्रथम विवाह असावा, वधू अथवा वर घटस्फोटीत असल्यास अशा प्रकारची मदत यापुर्वी घेतलेली नसावी. | | | |
| ७ | १८ वर्षावरिल दिव्यांगांना उदरनिर्वाह करीता अनुदान देणे. | प्रती माह रु.२,०००/- | ९० | रु.२१,६०,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती<br>७) मनपाने ज्या दिव्यांग व्यक्तींना व्यवसायासाठी कॅबीन उपलब्ध करून दिलेले आहेत त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. ८) दर वर्षी अर्ज सादर करणे आवश्यक आहे. ९) ८० टक्के ते १०० टक्के दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग व्यक्तींस या योजनेचा लाभ घेता येईल. १०) दिव्यांग व्यक्तींस सदर योजनेचा लाभ प्रत्येक आर्थिक वर्षात माहे एप्रिल ते माहे मार्चपर्यंतचा देण्यात येईल. | | | |
| ८ | कृष्ठरुग्णांना अनुदान देणे | प्रती माह रु. २,०००/- | १० | रु.२,४०,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती<br>७) कुष्टपिडीत व्यक्तींना सदर योजनेचा लाभ प्रत्येक आर्थिक वर्षात माहे एप्रिल ते माहे मार्चपर्यंतचा देण्यात येईल. ८) दर वर्षी अर्ज सादर करणे आवश्यक आहे. ९) कुष्ठपिडीत कारणास्तव किमान ४० टक्के व त्यापेक्षा जास्त कार्यात्मक/क्रियात्मक (Functional) असलेबाबत जिल्हा शल्य चिकीस्तक यांचे रुग्णालयाकडील प्रमाणपत्र. | | | |
| ९ | दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणीक साहीत्य /सहाय्यक उपकरणे खरेदीकामी अनुदान | प्रती लाभार्थी रु.२५,०००/- | १६ | रु.४,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) मुख्यध्यापक किंवा प्राचार्य यांचे शाळा/महाविद्यालयात शिक्षण घेत असलेबाबतचे प्रमाणपत्र. ८) ज्या साहित्याची आवश्यकता आहे त्या साहित्याचे दरपत्रक/कोटेशन. | | | |
| १० | दिव्यांग व्यक्तींस सहाय्यकउपकरणेखरेदी करणेकामी अनुदान देणे. | प्रती लाभार्थी रु.२५,०००/- | २० | रु.५,००,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) ज्या साहित्याची आवश्यकता आहे त्या साहित्याचे दरपत्रक/कोटेशन. | | | |

**भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींकरीता सामुदायीकरिता राबविण्यात येणा-या योजना व इतरे करावयाची कामे.**

| अ. क्र. | योजना व करावयाची कामे | लाभाचे स्वरुप | लाभार्थी संख्या | त्यासाठी लागणारा निधी |
|---|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींकरीता थेरपी सेंटर निर्माण करुन त्याठिकाणी थेरपी साहित्य उपलब्ध करून देणे. | रु. ५,००,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु.५,००,०००/- |
| २ | महानगरपालिका सार्वजनिक वाचनालयामध्ये दिव्यांग व्यक्तींकरीता ऑडिओ लायब्ररी निर्माण करणे. | रु.१०,००,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु.१०,००,०००/- |
| ३ | दिव्यांगाच्या क्रिडा, चित्रकला, हस्तकला इ. स्पर्धा आयोजित करणे. | रु. २,००,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु.२,००,०००/- |
| ४ | दिव्यांगांच्या कल्याणार्थ राबविण्यात येणा-या योजनांचा प्रचार/प्रसार करणे. | रु.१,००,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु. १,००,०००/- |
| ५ | उपरोक्त व्यतिरिक्त तिथल्या स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक असलेल्या महात्वाकांशी योजना अमंलात आणणे. | | | रु.१,६६,०००/- |
| | **एकूण रक्कम** | | | **रु. ८७,०२,०००/-** |

मला प्राप्त महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ2020/प्र.क्र.71(भाग 2)/ नवि.14, दि.06 जुन, 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत:कलम 452 अच्या (1 अ ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक, भिवंडी निजा. शहर महानगरपालिका, विभागप्रमुख, समाज कल्याण विभाग, सहायक आयुक्त, समाज कल्याण, उपायुक्त समाज कल्याण, व अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार उपरोक्त योजनाकरिता प्रथम येणा-या अर्जदारास प्रथम प्राध्यान्य या तत्त्वावर लाभ देणे. त्यानंतर सक्षम मान्यतेने दिव्यांगत्वाच्या टक्केवारीनुसार लाभ देण्यात येतील. एका दिव्यांग व्यक्तीस वरीलपैकी कोणत्याही एकाच आर्थिक लाभाच्या योजनेचा लाभ घेता येईल. प्राप्त होणारे अर्ज स्विकारणे अथवा नाकारण्याचे संपुर्ण अधिकार प्रशासक तथा आयुक्त सो. यांना राहतील. तसेच या योजनांकरिता दरवर्षी दिव्यांग कल्याण करिता राखीव असलेली अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेऊन लाभार्थी संख्या निश्चीत करण्यात येईल. यानुसार महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये दिव्यांग कल्याण विभागाकरिता राखीव असलेल्या निधीतून सदरच्या योजना व कामे करणेकामीच्या कामास,उक्त शासन निर्देशानुसार व नमुद अटी-शर्तीस अधिन राहून प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक,**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.**

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## अग्निशमन व आणीबाणी सेवा विभाग

**प्रस्तावना**

अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाकरिता अधिकारी/ कर्मचारी यांना आग व रेस्क्यु वर्दीवर काम करण्याकरिता अत्याधुनिक गणवेश (फायर प्रॉक्झीमीटी सुट)-३९ सुट, व्हिक्टीम लोकेशन कॅमेरा विथ ब्रिचींग-०१ सेट, न्युमॅटीक बॅग(एअर लिफींग बॅग विथ एअर सिलेंडर)-०१ सेट, लाईफ जॅकेट (पर्सनल फलोटींग डिव्हाईस)-६० नग, लाईफ बॉय रिंग-२० नग, पोर्टेबल स्टँड मॉनिटर (ग्राउंड मॉनिटर)-०१ नग खरेदी करण्याबाबतची ई निविदा ६९०४६९ दिनांक-२७/०५/२०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर निविदांचे छाननी अंति दस्तऐवज पुर्ण असल्यामुळे ४ निविदा निविदा समितीने पात्र ठरविल्या आहेत. लिफाफा २ फायनानशियल बीड दिनांक-१६/०६/२०२१ रोजी दुपारी १२.३१ वा. उघडण्यात आलेली असुन मे.वर्ल्ड फायर इंटरप्रायजेस, गुरगाव, हरियाना यांची सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.७१ % ने कमी दराने रु.८८,७३,५००/- (अठ्ठयाऐंशी लाख त्र्याहत्तर हजार पाचशे रु मात्र) इतक्या किमतीची होत आहे.

मे.वर्ल्ड फायर इंटरप्रायजेस, गुरगाव, हरियाना यांचे निविदेतील दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.७१ % ने कमी दराने म्हणजेच रक्कम रु. रु.८८,७३,५००/- (अठ्ठयाऐंशी लाख त्र्याहत्तर हजार पाचशे रु मात्र) मात्रचे असल्याने त्यास मा.उपआयुक्त (मुख्या), मुख्य लेखापरिक्षक तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त मोहदय यांनी त्यास दिनांक- रोजी पुर्वमान्यता दिलेली आहे. त्यास मंजुरी देण्याचा प्रस्ताव.

**ठराव क्रं.** - ०१७

**दिनांक-** ०९/०८/२०२२

अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाकरिता अधिकारी/ कर्मचारी यांना आग व रेस्क्यु वर्दीवर काम करण्याकरिता अत्याधुनिक गणवेश (फायर प्रॉक्झीमीटी सुट)-३९ सुट, व्हिक्टीम लोकेशन कॅमेरा विथ ब्रिचींग-०१ सेट, न्युमॅटीक बॅग(एअर लिफींग बॅग विथ एअर सिलेंडर)-०१ सेट, लाईफ जॅकेट (पर्सनल फलोटींग डिव्हाईस)-६० नग, लाईफ बॉय रिंग-२० नग, पोर्टेबल स्टँड मॉनिटर (ग्राउंड मॉनिटर)-०१ नग मे.वर्ल्ड फायर इंटरप्रायजेस, गुरगाव, हरियाना यांचेकडुन खरेदी करणेकामी रु.८८,७३,५००/- (अठ्ठयाऐंशी लाख त्र्याहत्तर हजार पाचशे रु मात्र) च्या खर्चास, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/ प्र.क्र.७१/नवि-१४, दिनांक-०९ नोव्हेंबर,२०२० अन्वये, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १९ दिनांक-०२/११/२०२० अन्वये अंतर्भुत केलेल्या कमल ४५२ अ (१अ) मधील तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, मंजुरी देत असुन मे.वर्ल्ड फायर इंटरप्रायजेस, गुरगाव, हरियाना यांचे सोबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) नुसार संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
**प्रशासक**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**